# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 26/02/2021 (शुक्रवार)

(सायंकाळ)

---

**सालईमेंढा त.कुही येथील खुनाचा 12 तासात उलगडा**
**स्थानिक गुन्हे शाखेने करुन आरोपीस केल गजाआड**

दिनांक 25/02/2021 रोजी पोलीस स्टेशन कुही अंतर्गत सालईमेंढा त. कुही जि. नागपूर येथील बद पडलेल्या काब्रा खदान (क्रेशर) येथे अंदाजन 200 फुट खाली फेकुन दिलेले अनोळखी प्रेत मिळून आल्याने, पोलीस स्टेशन कुही यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे तपासाची सुत्रे हलविण्यात आली. त्याच अनुषंगाने पोस्टे कुही येथे अपराध क. 53/2021 कलम 302 भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून, सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता व प्रेताची स्थिती व त्यास ज्या क्रुरतेने मारण्यात आले होते त्यावरुन तो खुन आहे यादिशेन सुत्रे हलविण्याच्या व त्याचा सखोल, तत्परतेने तपास होवून अनोळखी प्रेताची ओळख पटवून अज्ञात आरोपीस गजाआड करणे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून अत्यंत आवश्यक होते. यावरुन मा. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे श्री. अनिल जिट्टावार यांनी त्यांचे अधिनस्थ विशेष तपास पथक तयार करुन समांतर तपासाची सुत्रे हलविले.

विशेष तपास पथकाने सदर घटनास्थळ लगेच गाठून घटनास्थळाचे सुक्ष्म निरीक्षण अंती व प्रेताची स्थिती लक्षात घेता, स्थानिक जनतेस आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेत अवघ्या काही वेळातच प्रेताची ओळख पटविण्यास यश मिळविले. त्यात मृतक हा पाचगांव त. कुही येथील राहणारा स्थानिक नामे चंदु गंगाधार महापुर, वय 30 वर्ष, रा. पाचगावं, प्राथमिक आरोग्य दवाखान्याच्या बाजुला राहणारा अशी ओळख पटली. त्यानंतर सदर मृतक याची सर्वस्वी माहिती घेतली असता तो विवाहीत असून त्याला दोन अपत्य आहेत व त्याचे गावातील एका मुलीशी अनैतिक प्रेमप्रकरण सुरु असून, मागील काही दिवसांपासून त्यांच्या मनमुटावपणा वाढून प्रकरण वादातीत असल्याचे समजून आले. या माहितीच्या आधारे तपासाची दिशा ठरवून सातत्याने तसे साक्षीदार व सुंत्रामार्फत सखोल माहिती गोळा केली असता, पांचगावाजवळीलच सालईमेंढा येथे राहणारा मृतकाचा नातेवाईक नामे भारत वसंता गुजर, वय 25 वर्ष, धंदा – शेतीकाम, हा संशयीत असल्याचे निष्पन्न झाले. त्याला तातडीने अवघ्या 12 तासाच्या आत विश्वासात घेवून सखोल विचारपूस केली असता, त्याने गुन्हा केल्याचे सांगत, पांचगाव येथील मुलीशी मृतक नामे चंदु गंगाधार महापुर हा विवाहीत असून सुध्दा त्याचे अनैतिक प्रेमसंबंध होते. त्यातच त्या मुलीशी त्याचा मनमुटाव असून वाद सुरु आहे. त्याचप्रमाणे तीचा नागपूर येथील दुस–या मुलाशी लग्नकार्य तीचे आईवडील ठरवित असून, त्यात मृतक हा आडकाठी निर्माण करुन त्यांना अत्यंत त्रास देत असल्याच्या मुलीच्या तक्रारीप्रमाणे यातील नमुद आरोपी भारत गुजर याने सांगितले तसेच मागील काही दिवसापूर्वी मृतक हा भारत गुजरचा चांगला मित्र व नातेवाईक असून काही दिवसापूर्वी त्याचे उधारीचे मृतकाने पैसे परत न देता त्याच्यावर चाकु उगारला होता या कारणाचा फायदा घेत, मुलीच्या आईवडीलांनी भारत गुजर यास त्यांच्या कटात शामील करुन घेतले. त्यानंतर मुलीने भारत गुजर याला मृतक चंदु महापुर यास ठार मारणे कामी रु. 1,50,000/– व शरीर सुखाचे प्रलोभन दिले.

त्यानुसार दिनांक 25/02/2021 च्या दुपारी भारत गुजर यांने ठरल्याप्रमाणे मृतकास पाचगांव येथील देशी दारु भट्टीत दारु पाजून त्याच्या मोटर सायकलने सुरवातील काही निर्जन ठिकाणी फिरवून नंतर त्यांना कुणीही पाहले नाही याची खात्री करुन, सालईमेंढा येथील बंद अवस्थेत असलेली काब्रा खदान येथे घेवून गेला व तेथे त्याच्या शाब्दीक वाद घालून त्यास प्रथम दगडाने व नंतर जवळ असलेल्या धारदार हत्याराने त्याचा निर्दयपणे गळा चिरुन जागेवरच ठार केले.एवढेच नव्हे तर त्यास काही अंतर ओढत नेवून अंदाजे 200 फुट खोली असलेल्या खदानीमध्ये फेकुन दिली. व त्यानंतर मी तो नव्हेच अशी भुमिकाघेत स्वत: घरी जावून व त्यानंतर तो ज्यांच्या शेतात काम करतो त्याठिकाणी जावून शेती काम करावयास लागला. असे त्याने सांगितले. यावरुन त्यास व या कारस्थानात शामील मुलगी व तीचे आईवडील यांना पोस्टे कुही यांच्या ताब्यात घेवून पुढील तपास पो स्टे कुही करीत आहे.

सदरची कारवाई मा.श्री. राकेश ओला, पोलीस अधीक्षक, मा. श्री. राहुल माकणीकर,अपर पोलीस अधीक्षक, मा. श्री. संजय पुरंदरे, पोलीस उप अधीक्षक (गृह), मा. श्री. भिमराव टेळे, उपविभागीय पोलीस अधिकारी,उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिटट्‌ावार, सपोनि श्री. जितेंद्र वैरागडे, पोउपनि नरेंद्र गौरखेडे,पोउपनि जावेद शेख,पोहवा रमेश भोयर, पोहवा संतोश पंढरे, पोहवा मदन आसतकर, पोशि राधेश्याम कांबळे, पोशि बालाजी साखरे, चानापोशि अमोल कुथे, तसेच पोशि सतिश राठोड सायबर सेल आणि पोस्टे कुही येथील पोलीस निरीक्षक, श्री. चंद्रकांत मदने, सपोनि श्री. सोनटक्के, मसपोनि श्रीमती मांडवले, पोउपनि देरकर, सपोउपनि कुमरे, पोहवा लांजेवार, पोहवा घुटके, पोशि राठोड, पोशि पवन सावरकर, पोशि बुटले, मपोशि जयश्री सर्व नेमणूक पोस्टे कुही अशी संयुक्तरित्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर